RNI No. MAHBIL /2012/47985
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक-अ–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १३, अंक - ०१ ] गुरुवार ते बुधवार, जानेवारी ४ - १०, २०२४ / पौष १४ - २०, शके १९४५ [ पृष्ठे १०

## प्राधिकृत प्रकाशन

### आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांजकडून

**वाचा** : (१) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(३) (फ)*.

(२) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र. नपसु-२००१/प्र.क्र.१/२००१/५, दिनांक १ जानेवारी २००१.

(३) मुख्याधिकारी, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद यांचेकडील पत्र क्र. जा. क्र. वशि/१०/०४/२०२३-२०२४, दिनांक २६ एप्रिल २०२३.

(४) जिल्हाधिकारीसो, सातारा यांचेकडील क्र. साशा/नपा/का.-२ /पाचगणी उपविधी/९५/८४७/२०२३, दिनांक १७ जुलै २०२३.

*पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेच्या प्रवासी कर वसुली उपविधी २००१ व प्रदूषण नियंत्रण कर वसुली उपविधी २००१ मध्ये सुधारणा करणेबाबत.*

### अधिसूचना

क्रमांक नपा/२/कावि/८०९/२०२३.— ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(१)* अन्वये नगरपरिषदेस आपला कारभार चालविणेसाठी उपविधी करण्याचा अधिकार आहे. त्यानुसार पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(३) (अ)* अन्वये, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेच्या प्रवासी कर वसुली उपविधी २००१ व प्रदूषण नियंत्रण कर वसुली उपविधी २००१ मध्ये सुधारणा करणेच्या प्रारूप मसुद्यास मान्यता देणेसाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ नुसार उपविधी तयार केले असून, त्यास अंतिम मंजुरी प्राप्त करणेपूर्वी हरकती व सूचना मागविणेस मा. प्रशासकीय सभा ठराव क्रमांक १३७ अन्वये, दिनांक ४ जानेवारी २०२३ रोजी उपविधीचे प्रारूप मसुद्यास मान्यता देणेत आलेली आहे. मा. प्रशासकीय सभेच्या मान्यतेनंतर विषयांकित उपविधीच्या अनुषंगाने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(३)* (ब) अन्वये, पाचगणी नगरपरिषद हद्दीतील नागरिकांच्या हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रारूप उपविधीचा मसुदा पाचगणी नगरपरिषदेचे नोटिस बोर्डवर शासकिय सुट्ट्या वगळता कार्यालयीन वेळेत पाहावयास उपलब्ध असलेबाबत सदरचे प्रारूप उपविधी पाचगणी नगरपरिषदेचे नोटिस बोर्डवर व नगरपरिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर (http://panchgani.mahaulb.maharashtra.gov.in) प्रसिद्ध करणेत आलेले होते, तसेच दैनिक लक्ष्मीपुत्र व दैनिक कर्मयोगी या वर्तमानपत्राचे दिनांक १४ जानेवारी २०२३ चे अंकात सदरबाबत जाहीर नोटिस प्रसिद्ध करणेत आले होती. तथापि, विहित मुदतीत (३० दिवसांच्या आत) कोणतीही हरकत / सूचना नगरपरिषदेस प्राप्त झालेली नाही. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम, १९६५ मधील कलम ३२२ *(३) (क)* अन्वये हरकती अगर सूचना विचारात घेऊन ठरावाद्वारे उपविधीच्या अंतिम मसुद्यास मान्यता देण्याचे अधिकार विशेष सभेस आहेत असे नमूद आहे. तथापि, पाचगणी नगरपरिषदेने दिलेल्या नमूद कालावधीत कोणतीही हरकत / सूचना नगरपरिषदेस प्राप्त झालेली नसलेने मा. विशेष प्रशासकीय सभा ठराव क्रमांक १५१, दिनांक २० फेब्रुवारी २०२३ रोजी उपविधीचे अंतिम मसुद्यास मान्यता देणेत आलेली आहे.

त्याअर्थी, सदर उपविधीची छाननी करून ते योग्य असलेची खात्री झाल्यामुळे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(३) (फ)* मधील तरतुदीनुसार मला प्राप्त अधिकारांचा वापर करून मी, विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे हे पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेच्या प्रवासी कर वसुली उपविधी २००१ व प्रदूषण नियंत्रण कर वसुली उपविधी २००१ या उपविधी मध्ये सुधारणा करणेस मंजुरी देत आहे. सदरचे उपविधी राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अमलात येतील.

**पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेचे प्रवासी कर व प्रदूषण नियंत्रण कर उपविधी २०२३**

**(१) संक्षिप्त नाव व प्रारंभ :-**

(अ) या उपविधीस "पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेचे प्रवासी कर व प्रदूषण नियंत्रण कर उपविधी २०२३" असे संबोधण्यात येईल.

(ब) सदरचे उपविधी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध होतील त्या तारखेपासून अमलात येतील.

**(२) व्याख्या :-**

(१) संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर या उपविधीमध्ये -

(i) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.

(ii) "मुख्याधिकारी" म्हणजे नगरपरिषद क्षेत्रासाठी मुख्याधिकारी म्हणून या अधिनियम अन्वये नेमलेली किवा नेमणूक केली असल्याचे समजण्यात आलेली व्यक्ती.

(iii) "उपविधी" म्हणजे प्रस्तुतीची उपविधी.

(iv) "कलम" म्हणजे नगरपरिषद अधिनियमाचे कलम.

(v) "परिषद" म्हणजे पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, जिल्हा सातारा.

(vi) "नगरपरिषद हद्द" म्हणजे पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेची हद्द.

(vii) "प्रदूषण कर भरणेचे ठिकाण" म्हणजे नगरपरिषदेने नगरपरिषद हद्दीत प्रवेश करणेचे ठिकाणी बसविलेली वसुली चौकी टुरिस्ट ब्युरो कार्यालय बस स्टँड व वेळोवेळी नगरपरिषद, ठरवील ती ठिकाणे.

(viii) "वाहन" नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये प्रवेश करणाऱ्या प्रदूषण मोटार वाहन अधिनियम, १९५८, प्रमाणे मोटार येणाऱ्या सर्व वाहनांना प्रवेश करताना प्रवेश करण्याचे ठिकाणी वाहनाच्या आसन क्षमतेनुसार खालील तक्त्यातील दराने प्रवासी कर व प्रदूषण नियंत्रण कर वसूल करणेचा आहे.

(ix) "रहिवासी" म्हणजे कोणताही इसम पाचगणीत राहणारा किंवा पाचगणीमध्ये धंदा करणारा व ज्याची स्थावर मिळकत पाचगणी नगरपरिषद हद्दीत आहे असा इसम.

(x) "प्रवासी" म्हणजे कोणताही इसम मोटार गाडीतून, फटफटीवरून अगर मोटार टॅक्सीतून किंवा लोकसेवेच्या गाडीतून प्रवास करील असा प्रवासी. त्यामध्ये मोटार गाडी, मोटार टॅक्सी यांचे चालकांचा व लोकसेवा गाडीचे चालकांचा समावेश करणारा नाही.

(xi) "मोटार टॅक्सी" म्हणजे जी गाडी दहापर्यंत लोक भाड्याने अगर खुशीने वाहून नेण्यासाठी बनवलेली आहे अशी मोटार गाडी.

(xii) "मोटार गाडी" म्हणजे कोणतीही खाजगी मोटार गाडी जी चालकासह दहा लोक बसण्याची क्षमता आहे.

(xiii) "आराम गाडी" म्हणजे उच्च दर्जाची बनवलेली प्रवासी वाहून नेणारी मोटार गाडी.

(xiv) "खाजगी वाहन" म्हणजे कोणताही मोटार गाडी जिची दहांपेक्षा जास्त प्रवासी वाहून नेण्याची क्षमता आहे, यात मोटार टॅक्सी, मोटार लॉरी यांचा समावेश होईल.

(xv) "लोकसेवा गाडी" म्हणजे जी मोटार गाडी रस्त्यावरील प्रवासी भाड्याने व खुशीने वाहून नेणेची काम करते अशी गाडी.

(xvi) "कर" म्हणजे या उपविधीने प्रवासी व गिरिस्थानास भेट देणारे लोकांवर आकारलेला कर.

**(३) शुल्काचा दर व स्वरूप**

**(अ)**

| अ.क्र. | वाहनाची आसन क्षमता | प्रवासी कर (रक्कम रुपये) | प्रदूषण नियंत्रण कर (रक्कम रुपये) | एकूण (रक्कम रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | १ | २५ | ५० | ७५ |
| २ | २ | ५० | ५० | १०० |
| ३ | ३ | ७५ | ५० | १२५ |
| ४ | ४ | १०० | ५० | १५० |
| ५ | ५ | १२५ | ५० | १७५ |
| ६ | ६ | १५० | ५० | २०० |
| ७ | ७ | १७५ | ५० | २२५ |
| ८ | ८ | २०० | ५० | २५० |
| ९ | ९ | २२५ | ५० | २७५ |
| १० | १० | २५० | ५० | ३०० |
| ११ | ११ | २७५ | ५० | ३२५ |
| १२ | १२ | ३०० | ५० | ३५० |
| १३ | १३ | ३२५ | ५० | ३७५ |
| १४ | १४ | ३५० | ५० | ४०० |
| १५ | १५ | ३७५ | ५० | ४२५ |
| १६ | १६ | ४०० | ५० | ४५० |
| १७ | १७ | ४२५ | १०० | ५२५ |
| १८ | १८ | ४५० | १०० | ५५० |
| १९ | १९ | ४७५ | १०० | ५७५ |
| २० | २० | ५०० | १०० | ६०० |
| २१ | २१ | ५२५ | १०० | ६२५ |
| २२ | २५ | ६२५ | १०० | ७२५ |
| २३ | २९ | ७२५ | १०० | ८२५ |
| २४ | ३५ | ९७५ | १०० | ९७५ |
| २५ | ३९ | ८७५ | १०० | १०७५ |
| २६ | ४५ | ११२५ | १०० | १२२५ |
| २७ | ४९ | १२२५ | १०० | १३२५ |
| २८ | ५० | १२५० | १०० | १३५० |
| २९ | ५५ | १३७५ | १०० | १४७५ |
| ३० | ५६ | १४०० | १०० | १५०० |

(ब) जी वाहने नगरपरिषद हद्दीत प्रवेश करून नगरपरिषद हद्दीत थांबतील अशा चारचाकी लहान वाहनांना प्रवासी वाहनक्षमता अधिक रुपये ५० (पन्नास फक्त) आणि सहा चाकी टेम्पो, ट्रक, बस, इत्यादी अशा वाहनांना प्रवासी वाहनक्षमता अधिक रुपये ७० (सत्तर फक्त) याप्रमाणे प्रदूषण नियंत्रण कर भरावा लागेल.

(क) रस्त्याने चालत पाचगणीला येणारा, तसेच सायकलने येणारा व्यक्तीकडून प्रत्येकी रुपये २५ (पंचवीस फक्त) प्रवासी कर वसूल केला जाईल.

(ड) इयत्ता १ ते १० वी चे शालेय विद्यार्थी किंवा विद्यार्थीनींना ज्यावेळी शाळेच्या सहलीस शाळेच्या अधिकाऱ्याचे दाखल्यासह येतील तेव्हा प्रती विद्यार्थी रुपये २.०० (दोन फक्त).

(इ) सर्व महाविद्यालयीन विद्यार्थी किवा विद्यार्थीनींना ज्यावेळी शाळेच्या सहलीस शाळेच्या अधिकाऱ्याचे दाखल्यासह येतील तेव्हा प्रती विद्यार्थी रुपये ५.०० (पाच फक्त).

(फ) शाळेच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी प्रती व्यक्ती रुपये ५.०० (पाच फक्त).

नगरपरिषद हद्दीतील कायम रहिवासी नागरिकांच्या प्रत्येक वाहनांसाठी प्रत्येक वर्षासाठी रुपये १०० ( शंभर फक्त) प्रदूषण नियंत्रणकर भरावा लागेल, यासाठी संबंधित वाहन धारकांना, आपल्या वाहनाची नोंद नगरपरिषदेकडे करावी लागेल, दर वर्षासाठी म्हणजे दिनांक १ एप्रिल रोजी सुरू होऊन दिनांक ३१ मार्च या काळासाठी असे समजले जाईल. वर्षाच्या सहामाहीच्या पहिल्या सहामाहीत अगर दुसऱ्या सहामाहीत केव्हाही शहरात आलेल्या वाहनांवर वाहनधारकांना संपूर्ण सहामाहीचा प्रदूषण कर भरावा लागेल.

**(४) प्रवासी कर माफीच्या बाबी --**

(१) नगरपरिषद हद्दीतील रहिवाशी.

(२) सात वर्षांखालील सर्व मुले.

(३) सरकारी कामाकरिता येणारे केंद्र, राज्य सरकारचे, जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी, जिल्हा शालेय संस्थांचे अधिकारी व त्यांचे कुटुंबीय व नोकर.

(४) राष्ट्रीय मेळाव्याचे प्रतिनिधी वास्तव्यासाठी अगर फिरतीवर आल्यास.

(५) स्थानिक लग्न समारंभासाठी येणारे वऱ्हाडी.

(६) स्थानिक खेळांचे सामन्यांकरिता आलेले खेळाडू.

(७) अपंग व्यक्ती.

(८) महाबळेश्वर तहसीलमधील खेड्यातील रहिवासी अगर पाचगणी / महाबळेश्वर नगरपरिषदेच्या हद्दीतील रहिवासी व सरकारी कामाकरिता अथवा खाजगी कामाकरिता आले असतील व त्याच दिवशी परत जाणार असतील, तसेच पर्यटन स्थळास भेट देणार नसतील तर.

(९) राज्य परिवहन महामंडळाचे कार्यालयीन कामाकरिता आलेले अधिकारी, सेवक.

(१०) कोर्टाचे न्यायालयीन कामाकरिता आलेले वकील, वादी, प्रतिवादी, साक्षीदार ज्यांना महाबळेश्वर येथील न्यायालयात यावे लागेल ते व इतर इसम ज्यांना कामाकरिता इतर सरकारी कार्यालयात हजर रहावे लागेल ते.

(११) परदेशी वकील व व्यापारी प्रतिनिधी यांचे कुटुंबियांसमवेत आणि अशा वकिलातीच्या व व्यापारी प्रतिनिधीच्या कार्यालयामधील नोकर वर्ग.

(१२) नगरपालिका हद्दीमध्ये कामानिमित्त दररोज येणारी व्यक्ती.

(१३) खेड्यामधून कामानिमित्त व खरेदीसाठी पाचगणीमध्ये येणारी व्यक्ती.

(१४) अंत्यविधीसाठी उपस्थित राहिलेले.

(१५) आरोग्यधामाचे व वसतिगृहयुक्त सर्व शाळांचे वसतिगृहामध्ये राहणारे इसम.

(१६) सार्वजनिक आरोग्यधामामुळे सूट अगर माफीचे दरात औषधोपचार घेणारे आजारी व्यक्ती.

**(५) प्रदूषण कर माफीच्या बाबी --**

(अ) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व आगाराच्या सर्व प्रकारच्या बस गाड्या.

(ब) महाराष्ट्र राज्य सरकारची / अन्य राज्य सरकारची, तसेच इतर सर्व निमशासकीय कार्यालयाची सर्व प्रकारची शासकीय वाहने.

(क) मध्यवर्ती सरकारच्या सर्व खात्यांची सर्व शासकीय वाहने.

(ख) नगरपरिषद हद्दीत प्रवेश करणारी इलेक्ट्रिक वाहने.

(ग) रुग्णवाहिका.

**(६) शास्ती.**

१. उपविधी पाचप्रमाणे स्थानिक वाहनधारकांनी, वाहनाची नोंद करून प्रदूषण नियंत्रणकर न भरता, वाहन वापरात असल्याचे आढळल्यास ते संबंधित वाहनधारक, शाबितीनंतर प्रत्येक वर्षासाठी पराकाष्टा रुपये ५०० (पाचशे फक्त) एवढ्या दंडास पात्र होतील.

२. उपविधी तीनप्रमाणे प्रदूषण नियंत्रण कर भरून शहरात येणारी वाहने, शहराच्या बाहेर न जाता, अर्ध्या तासापेक्षा जास्त कालावधीनंतर, शहरात असल्याचे आढल्यास, असे वाहन अटकावून ठेवण्याचे अधिकार पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना असतील, संबंधित वाहनधारकांनी, उपविधी ३ मध्ये नमूद केलेल्या प्रदूषण नियंत्रणकराच्या दुप्पट दराने कर भरलेशिवाय त्या वाहनास सोडता येणार नाही.

३. उपविधी चार (क) च्या प्रयोजनार्थ प्रदूषण नियंत्रणकर भरणाऱ्या वाहनधारकांना, मुख्याधिकारी, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद हे ठरवतील त्यानुसार नमुन्यात प्रवेश करते वेळी प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल.

४. एखाद्या प्रवाशाने प्रवासी व प्रदूषण कर चुकवून नगरपरिषद हद्दीमध्ये प्रवेश केलेचे आढळलेस तो प्रवासी दहापट प्रवासीकर व प्रदूषण नियंत्रणकर रक्कम दंड म्हणून देणेस पात्र राहिल आणि एखाद्या प्रवाशाने प्रवासीकर व प्रदूषण नियंत्रणकर भरणेस नकार दिलेस त्यास नगरपरिषद हद्दीमध्ये प्रवेश नाकारणेत येईल. पाचगणी नगरपरिषद हद्दीतून सरळ बाहेर प्रवासाकरिता ३० (तीस) मिनिटांपर्यंतचा वेळ दिला जाईल. त्यापेक्षा जास्त वेळ झालेस नियमानुसार प्रवासी कर भरावा लागेल.

५. प्रदूषण नियंत्रणकरापासून मिळणारे सर्व उत्पन्न प्रदूषण नियंत्रणाच्या कामासाठी वापरावे लागेल. या करापासून मिळणारे उत्पन्न व त्यामधून होणारा खर्च यांचे स्वतंत्र हिशेब ठेवणे नगरपरिषदेवर बंधनकारक राहील.

६. या उपविधीचा भंग करणारे अंतिम शाबीतीनंतरच्या पाराकाष्ठेला रक्कम रुपये ५०० (पाचशे फक्त) दंडास पात्र होतील.

७. हे उपविधी अमलात आलेवर यासंबंधी सद्या अस्तित्वात असणारी कार्यपद्धती आपोआपच निरस होईल.

**(७) प्रवासी / प्रदूषण कर पुनर्निर्धारण --**

उपविधी क्रमांक ३ प्रमाणे ठरविलेली प्रवासी कर व प्रदूषण नियंत्रण कराची रक्कम वाढ करणेची झालेस नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा ही सक्षम असेल व त्यामध्ये निर्णय झालेनंतर त्याची अंमलबजावणी करणेत येईल. त्या उपविधीमध्ये दुरुस्तीस शासनाची मंजुरी घेणेची आवश्यकता नाही.

**(८) प्रवासी / प्रदूषण कर वसुली --**

उपविधी क्रमांक ५ मधील प्रवासीकर व प्रदूषण नियंत्रणकराची वसुली ही महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १५०, १५१ व १५२ मधील तरतुदीनुसार करण्यात येईल.

सदरची वसुली फास्ट टॅग किंवा इतर तत्सम डिजिटल प्रणालीचा वापर करून करण्यात येईल.

**(९) प्रवासी / प्रदूषण कर विनियोग --**

दरवर्षी प्रवासी करामधून प्राप्त होणाऱ्या रकमेतून नागरिक, तसेच पर्यटक यांना दर्जेदार मूलभूत सुविधा, रस्ते, दिवाबत्ती स्वच्छता इत्यादी कामांसाठी नगरपरिषदामार्फत खर्च करण्यात येईल, तसेच प्रदूषण नियंत्रण करमधून मिळणाऱ्या रकमेतून प्रदूषण नियंत्रण विषयक कामे उदा. वृक्ष संवर्धन, स्वच्छता, सांडपाणी प्रक्रिया व पर्यावरण संवर्धनविषयक कामासाठी खर्च करण्यात येईल. सदर खर्चासाठी प्रस्तावित केलेल्या प्रदूषण नियंत्रण कराच्या वसूल झालेल्या रकमेचा विनियोग करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

**सौरभ राव,**

आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,

पुणे, २२ डिसेंबर २०२३.

पुणे विभाग, पुणे.

**वाचा** : (१) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(३) (फ)*.

(२) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक नपसु-२००१/प्र.क्र. १/२००१/५, दिनांक १ जानेवारी २००१.

(३) मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद यांचेकडील पत्र क्रमांक जा. क्रमांक ८/७५/२०२२, दिनांक ६ डिसेंबर २०२२.

(४) जिल्हाधिकारीसो, सातारा यांचेकडील क्रमांक साशा/नपा/का.-२/महाबळेश्वर उपविधी/२००/३३०२ /२०२२, दिनांक ३ जानेवारी २०२३.

*महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद, जिल्हा सातारा, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२* (३) (फ) *अन्वये प्रवासी कर वसुली उपविधी २००० व प्रदूषण कर वसुली उपविधी २००० या उपविधीमध्ये सुधारणा करणेबाबत.*

## अधिसूचना

जा. क्र. नपा/२/कावि/८१०/२०२३.--ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(१)* अन्वये नगरपरिषदेस आपला कारभार चालविणेसाठी उपविधी करण्याचा अधिकार आहे. त्यानुसार महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(३) (अ)* अन्वये, महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेच्या प्रवासी कर वसुली उपविधी २००० व प्रदूषण कर वसुली उपविधी २००० मध्ये सुधारणा करणेच्या प्रारूप मसुद्यास मान्यता देणेसाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ नुसार उपविधी तयार केले असून, त्यास अंतिम मंजुरी प्राप्त करणेपूर्वी हरकती व सूचना मागविणेस प्रशासकीय सभा ठराव क्रमांक ५ अन्वये, दिनांक १० जून २०२२ रोजी उपविधीचे प्रारूप मसुद्यास मान्यता देणेत आलेली आहे.

प्रशासकीय सभेच्या मान्यतेनंतर विषयांकित उपविधीच्या अनुषंगाने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(३) (ब)* अन्वये महाबळेश्वर नगरपरिषद हद्दीतील नागरिकांच्या हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रारूप उपविधीचा मसुदा महाबळेश्वर नगरपरिषदेचे नोटिस बोर्डवर शासकीय सुट्ट्या वगळता कार्यालयीन वेळेत पाहावयास उपलब्ध असलेबाबत सदरचे प्रारूप उपविधी महाबळेश्वर नगरपरिषदेचे नोटिस बोर्डवर व नगरपरिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर (http://mahabaleshwarmnahatilb.maharashtra.gov.in) प्रसिद्ध करणेत आलेले होते, तसेच दैनिक मुक्तागिरी व दैनिक कर्मयोगी या वर्तमानपत्राचे दिनांक १९ ऑक्टोबर २०२२ चे अंकात सदरबाबत जाहीर नोटिस प्रसिद्ध करणेत आले होती.

तथापि, दिनांक १९ ऑक्टोबर २०२२ रोजीचे जाहीर नोटिसीप्रमाणे विहित मुदतीत (३०) दिवसांच्या आत नगरपरिषदेकडे कोणतीही हरकत / सूचना नगरपरिषदेस प्राप्त झालेली नाही. महाबळेश्वर नगरपरिषदेने दिलेल्या नमूद कालावधीत कोणतीही हरकत / सूचना नगरपरिषदेस प्राप्त झालेली नसलेने मा. विशेष प्रशासकीय सभा ठराव क्रमांक १०८ दिनांक २ डिसेंबर २०२२ रोजी उपविधीचे अंतिम मसुद्यास मान्यता देणेत आलेली आहे.

त्याअर्थी, सदर उपविधीची छाननी करून ते योग्य असलेची खात्री झाल्यामुळे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३२२ *(३) (फ)* मधील तरतुदीनुसार मला प्राप्त अधिकारांचा वापर करून मी, विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे हे महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेच्या प्रवासी कर वसुली उपविधी २००० व प्रदूषण कर वसुली उपविधी २००० या उपविधीमध्ये सुधारणा करणेस मंजुरी देत आहे. सदरचे उपविधी राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अमलात येतील.

### महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेचे प्रवासी कर व प्रदूषण नियंत्रण करणेसाठी बसविणेच्या करासंबंधीचे उपविधी २०२३

महाबळेश्वर हे जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ असल्याने वर्षाला या ठिकाणी लाखो पर्यटक भेट देत असतात. महाबळेश्वर नगरपरिषद तर्फे येणारे प्रवासी व वाहने यांचेकडून वसुली नाक्यावर प्रवासी व प्रदूषण कर मनुष्यबळ वापरून वसूल करण्यात येतो. सदरची वसुली करताना खूप मोठ्या प्रमाणावर वाहनांची गर्दी होऊन पर्यटकांना साधारण दोन ते तीन तास वाहनांच्या रांगेत थांबावे लागत आहे. यामुळे ट्राफिकची समस्या निर्माण होत असून त्याचा परिणाम महाबळेश्वरच्या पर्यटनावर होत आहे. सदरच्या समस्या टाळणेकरिता येणाऱ्या वाहनास प्रति वाहन क्षमतेनुसार एकच दर आकारून त्याची वसुली फास्ट टॅग किंवा इतर तत्सम डिजिटल प्रणालीचा वापर करणे आवश्यक आहे.

**(१) संक्षिप्त नाव व प्रारंभ :**

(अ) या उपविधीस "महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेचे प्रवासी कर व प्रदूषण नियंत्रण कर उपविधी २०२३" असे संबोधण्यात येईल.

(ब) सदरचे उपविधी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध होतील त्या तारखेपासून अमलात येतील.

**(२) व्याख्या :**

(१) संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर या उपविधीमध्ये --

(i) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५.

(ii) "मुख्याधिकारी" म्हणजे नगरपरिषद क्षेत्रासाठी मुख्याधिकारी म्हणून या अधिनियम अन्वये नेमलेली किवा नेमणूक केली असल्याचे समजण्यात आलेली व्यक्ती.

(iii) "उपविधी" म्हणजे प्रस्तुतीची उपविधी.

(iv) "कलम" म्हणजे नगरपरिषद अधिनियमाचे कलम.

(v) "परिषद" म्हणजे महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद, जिल्हा सातारा.

(vi) "नगरपरिषद हद्द" म्हणजे महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेची हद्द.

(vii) "प्रदूषण कर भरणेचे ठिकाण" म्हणजे नगरपरिषदेने नगरपरिषद हद्दीत प्रवेश करणेचे ठिकाणी बसविलेली वसुली चौकी टुरिस्ट ब्युरो कार्यालय बस स्टँड व वेळोवेळी नगरपरिषद ठरवील ती ठिकाणे.

(viii) "वाहन" नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये प्रवेश करणाऱ्या प्रदूषण मोटार वाहन अधिनियम, १९५८ प्रमाणे मोटार येणाऱ्या सर्व वाहनांना प्रवेश करताना प्रवेश करण्याचे ठिकाणी वाहनाच्या आसन क्षमतेनुसार खालील तक्त्यातील दराने प्रवासी कर व प्रदूषण नियंत्रण कर वसूल करणेचा आहे.

(ix) "रहिवासी" म्हणजे कोणताही इसम महाबळेश्वर हद्दीत राहणारा किवा महाबळेश्वरमध्ये धंदा करणारा व ज्याची स्थावर मिळकत महाबळेश्वर नगरपरिषद हद्दीत आहे असा इसम.

(x) "प्रवासी" म्हणजे कोणताही इसम मोटारगाडीतून, फटफटीवरून अगर मोटार टॅक्सीतून किंवा लोकसेवेच्या गाडीतून प्रवास करील असा प्रवासी. त्यामध्ये मोटार गाडी, मोटार टॅक्सी यांचे चालकांचा व लोकसेवा गाडीचे चालकांचा समावेश करणारा नाही.

(xi) "मोटार टॅक्सी" म्हणजे जी गाडी दहापर्यंत लोक भाड्याने अगर खुशीने वाहून नेण्यासाठी बनवलेली आहे अशी मोटार गाडी.

(xii) "मोटार गाडी" म्हणजे कोणतीही खाजगी मोटार गाडी जी चालकासह दहा लोक बसण्याची क्षमता आहे.

(xiii) "आराम गाडी" म्हणजे उच्च दर्जाची बनवलेली प्रवासी वाहून नेणारी मोटार गाडी.

(xiv) "खाजगी वाहन" म्हणजे कोणताही मोटार गाडी जिची दहांपेक्षा जास्त प्रवासी वाहून नेण्याची क्षमता आहे, यात मोटार टॅक्सी, मोटार लॉरी यांचा समावेश होईल.

(xv) "लोकसेवा गाडी" म्हणजे जी मोटार गाडी रस्त्यावरील प्रवासी भाड्याने व खुशीने वाहून नेणेची काम करते अशी गाडी.

(xvi) "कर" म्हणजे या उपविधीने प्रवासी व गिरिस्थानास भेट देणारे लोकांवर आकारलेला कर.

**(३) शुल्काचा दर व स्वरूप**

**(अ)**

| अ.क्र. | वाहनाची आसन क्षमता | प्रवासी कर (रक्कम रुपये) | प्रदूषण नियंत्रण कर (रक्कम रुपये) | एकूण (रक्कम रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | १ | २५ | ५० | ७५ |
| २ | २ | ५० | ५० | १०० |
| ३ | ३ | ७५ | ५० | १२५ |
| ४ | ४ | १०० | ५० | १५० |
| ५ | ५ | १२५ | ५० | १७५ |
| ६ | ६ | १५० | ५० | २०० |
| ७ | ७ | १७५ | ५० | २२५ |
| ८ | ८ | २०० | ५० | २५० |
| ९ | ९ | २२५ | ५० | २७५ |
| १० | १० | २५० | ५० | ३०० |

| अ.क्र. | वाहनाची आसन क्षमता | प्रवासी कर (रक्कम रुपये) | प्रदूषण नियंत्रण कर (रक्कम रुपये) | एकूण (रक्कम रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ११ | ११ | २७५ | ५० | ३२५ |
| १२ | १२ | ३०० | ५० | ३५० |
| १३ | १३ | ३२५ | ५० | ३७५ |
| १४ | १४ | ३५० | ५० | ४०० |
| १५ | १५ | ३७५ | ५० | ४२५ |
| १६ | १६ | ४०० | ५० | ४५० |
| १७ | १७ | ४२५ | १०० | ५२५ |
| १८ | १८ | ४५० | १०० | ५५० |
| १९ | १९ | ४७५ | १०० | ५७५ |
| २० | २० | ५०० | १०० | ६०० |
| २१ | २१ | ५२५ | १०० | ६२५ |
| २२ | २५ | ६२५ | १०० | ७२५ |
| २३ | २९ | ७२५ | १०० | ८२५ |
| २४ | ३५ | ९७५ | १०० | ९७५ |
| २५ | ३९ | ८७५ | १०० | १०७५ |
| २६ | ४५ | ११२५ | १०० | १२२५ |
| २७ | ४९ | १२२५ | १०० | १३२५ |
| २८ | ५० | १२५० | १०० | १३५० |
| २९ | ५५ | १३७५ | १०० | १४७५ |
| ३० | ५६ | १४०० | १०० | १५०० |

(ब) जी वाहने नगरपरिषद हद्दीत प्रवेश करून नगरपरिषद हद्दीत थांबतील अशा चारचाकी लहान वाहनांना प्रवासी वाहन क्षमता अधिक रुपये ५० (पन्नास फक्त) आणि सहाचाकी टेम्पो, ट्रक, बस, इत्यादी अशा वाहनांना प्रवासी वाहन क्षमता अधिक रुपये १०० (शंभर फक्त) याप्रमाणे प्रदूषण नियंत्रण कर भरावा लागेल.

(क) रस्त्याने चालत महाबळेश्वरला येणारा, तसेच सायकलने येणाऱ्या व्यक्तीकडून प्रत्येकी रुपये २५ (पंचवीस फक्त) प्रवासी कर वसूल केला जाईल.

(ड) इयत्ता १ ते १० वी चे शालेय विद्यार्थी किंवा विद्यार्थिनींनी ज्यावेळी शाळेच्या सहलीस शाळेच्या अधिकाऱ्यांचे दाखल्यासह येतील तेव्हा प्रती विद्यार्थी रुपये १.०० (एक फक्त).

(इ) सर्व महाविद्यालयीन विद्यार्थी किंवा विद्यार्थिनींनी ज्यावेळी शाळेच्या सहलीस शाळेच्या अधिकाऱ्यांचे दाखल्यासह येतील तेव्हा प्रती विद्यार्थी रुपये ५.०० (पाच फक्त).

(फ) शाळेच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी प्रती व्यक्ती रुपये ५.०० (पाच फक्त).

नगरपरिषद हद्दीतील कायम रहिवासी नागरिकांच्या प्रत्येक वाहनांसाठी प्रत्येक वर्षासाठी रुपये १०० (शंभर फक्त) प्रदूषण नियंत्रणकर भरावा लागेल, यासाठी संबंधित वाहन धारकांना, आपल्या वाहनांची नोंद नगरपरिषदेकडे करावी लागेल, दर वर्षासाठी म्हणजे दिनांक १ एप्रिल रोजी सुरू होऊन दिनांक ३१ मार्च या काळासाठी असे समजले जाईल. वर्षाच्या सहामाहीच्या पहिल्या सहामाहीत अगर दुसऱ्या सहामाहीत केव्हाही शहरात आलेल्या वाहनांवर वाहनधारकांना संपूर्ण सहामाहीचा प्रदूषण कर भरावा लागेल.

**(४) प्रवासी कर माफीच्या बाबी --**

(१) नगरपरिषद हद्दीतील रहिवासी.

(२) सात वर्षेखालील सर्व मुले.

(३) सरकारी कामाकरिता येणारे केंद्र, राज्य सरकारचे, जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी, जिल्हा शालेय संस्थांचे अधिकारी व त्यांचे कुटुंबीय व नोकर.

(४) राष्ट्रीय मेळाव्याचे प्रतिनिधी वास्तव्यासाठी अगर फिरतीवर आल्यास.

(५) स्थानिक लग्न समारंभांसाठी येणारे वऱ्हाडी.

(६) स्थानिक खेळांचे सामन्यांकरिता आलेले खेळाडू.

(७) अपंग व्यक्ती.

(८) महाबळेश्वर तहसीलमधील खेड्यातील रहिवासी अगर पाचगणी / महाबळेश्वर नगरपरिषदेच्या हद्दीतील रहिवासी व सरकारी कामाकरिता अथवा खाजगी कामाकरिता आले असतील व त्याच दिवशी परत जाणार असतील, तसेच पर्यटन स्थळास भेट देणार नसतील तर.

(९) राज्य परिवहन महामंडळाचे कार्यालयीन कामाकरिता आलेले अधिकारी, सेवक.

(१०) कोर्टाचे न्यायालयीन कामाकरिता आलेले वकील, वादी, प्रतिवादी, साक्षीदार ज्यांना महाबळेश्वर येथील न्यायालयात यावे लागेल ते व इतर इसम ज्यांना कामाकरिता इतर सरकारी कार्यालयात हजर रहावे लागेल ते.

(११) परदेशी वकील व व्यापारी प्रतिनिधी यांचे कुटुंबीयांसमवेत आणि अशा वकिलातीच्या व व्यापारी प्रतिनिधीच्या कार्यालयामधील नोकर वर्ग.

(१२) नगरपालिका हद्दीमध्ये कामानिमित्त दररोज येणारी व्यक्ती.

(१३) खेड्यामधून कामानिमित्त व खरेदीसाठी महाबळेश्वरमध्ये येणारी व्यक्ती.

(१४) अंत्यविधीसाठी उपस्थित राहिलेले.

(१५) आरोग्यधामाचे व वसतिगृहयुक्त सर्व शाळांचे वसतिगृहामध्ये राहणारे इसम.

(१६) सार्वजनिक आरोग्यधामामुळे सूट अगर माफीचे दरात औषधोपचार घेणारे आजारी व्यक्ती.

**(५) प्रदूषण कर माफीच्या बाबी --**

(अ) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व आगाराच्या सर्व प्रकारच्या बस गाड्या.

(ब) महाराष्ट्र राज्य सरकारची / अन्य राज्य सरकारची, तसेच इतर सर्व निमशासकीय कार्यालयाची सर्व प्रकारची शासकीय वाहने.

(क) मध्यवर्ती सरकारच्या सर्व खात्यांची सर्व शासकीय वाहने.

(ख) नगरपरिषद हद्दीत प्रवेश करणारी इलेक्ट्रिक वाहने.

**(६) शास्ती --**

१. उपविधी पाचप्रमाणे स्थानिक वाहनधारकांनी, वाहनाची नोंद करून प्रदूषण नियंत्रणकर न भरता, वाहन वापरात असल्याचे आढळल्यास ते संबंधित वाहनधारक, शाबितीनंतर प्रत्येक वर्षासाठी पराकाष्टा रुपये ५०० (पाचशे फक्त) एवढ्या दंडास पात्र होतील.

२. उपविधी तीनप्रमाणे प्रदूषण नियंत्रणकर भरून शहरात येणारी वाहने, शहराच्या बाहेर न जाता, अर्ध्या तासापेक्षा जास्त कालावधीनंतर, शहरात असल्याचे आढळल्यास, असे वाहन अटकावून ठेवण्याचे अधिकार महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना असतील, संबंधित वाहनधारकांनी, उपविधी ३ मध्ये नमूद केलेल्या प्रदूषण नियंत्रणकराच्या दुप्पट दराने कर भरलेशिवाय त्या वाहनास सोडता येणार नाही.

३. उपविधी चार (क) च्या प्रयोजनार्थ प्रदूषण नियंत्रणकर भरणाऱ्या वाहनधारकांना, मुख्याधिकारी, महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद हे ठरवतील त्यानुसार नमुन्यात प्रवेश करते वेळी प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल.

४. एखाद्या प्रवाशाने प्रवासी व प्रदूषण कर चुकवून नगरपरिषद हद्दीमध्ये प्रवेश केलेचे आढळलेस तो प्रवासी दहापट प्रवासीकर व प्रदूषण नियंत्रणकर रक्कम दंड म्हणून देणेस पात्र राहील आणि एखाद्या प्रवाशाने प्रवासीकर व प्रदूषण नियंत्रणकर भरणेस नकार दिलेस त्यास नगरपरिषद हद्दीमध्ये प्रवेश नाकारणेत येईल. महाबळेश्वर नगरपरिषद हद्दीतून सरळ बाहेर प्रवासाकरिता ३० (तीस) मिनिटांपर्यंतचा वेळ दिला जाईल. त्यापेक्षा जास्त वेळ झालेस नियमानुसार प्रवासी कर भरावा लागेल.

५. जी लहान-मोठी वाहने नगरपरिषद हद्दीत प्रवेश करून नगरपरिषद हद्दीत न थांबता हद्दीबाहेर जातील अशा वाहनांना प्रवेश करताना रुपये ५० (पन्नास फक्त) प्रदूषण कर भरावा लागेल.

६. प्रदूषण नियंत्रण करापासून मिळणारे सर्व उत्पन्न प्रदूषण नियंत्रणाच्या कामासाठी वापरावे लागेल. या करापासून मिळणारे उत्पन्न व त्यामधून होणारा खर्च यांचे स्वतंत्र हिशेब ठेवणे नगरपरिषदेवर बंधनकारक राहील.

७. या उपविधीचा भंग करणारे अंतिम शाबीतीनंतरच्या पराकाष्ठेला रक्कम रुपये ५०० (पाचशे फक्त) दंडास पात्र होतील.

८. हे उपविधी अमलात आलेवर यासंबंधी सद्या अस्तित्वात असणारी कार्यपद्धती आपोआपच निरस होईल.

**(७) प्रवासी प्रदूषण कर पुनर्निर्धारण --**

उपविधी क्रमांक ३ प्रमाणे ठरविलेली प्रवासी कर व प्रदूषण नियंत्रण कराची रक्कम वाढ करणेची झालेस नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा ही सक्षम असेल व त्यामध्ये निर्णय झालेनंतर त्याची अंमलबजावणी करणेत येईल. त्या उपविधीमध्ये दुरुस्तीस शासनाची मंजुरी घेणेची आवश्यकता नाही.

**(८) प्रवासी / प्रदूषण कर वसुली --**

उपविधी क्रमांक ५ मधील प्रवासीकर व प्रदूषण नियंत्रणकराची वसुली ही महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १५०, १५१ व १५२ मधील तरतुदीनुसार करण्यात येईल.

सदरची वसुली फास्ट टॅग किंवा इतर तत्सम डिजिटल प्रणालीचा वापर करून करण्यात येईल.

**(९) प्रवासी / प्रदूषण कर विनियोग --**

दरवर्षी प्रवासी करामधून प्राप्त होणाऱ्या रकमेतून नागरिक, तसेच पर्यटक यांना दर्जेदार मूलभूत सुविधा, रस्ते, दिवाबत्ती, स्वच्छता इत्यादी कामांसाठी नगरपरिषद मार्फत खर्च करण्यात येईल, तसेच प्रदूषण नियंत्रण करमधून मिळणाऱ्या रकमेतून प्रदूषण नियंत्रण विषयक कामे उदा. वृक्ष संवर्धन, स्वच्छता, सांडपाणी प्रक्रिया व पर्यावरण संवर्धनविषयक कामासाठी खर्च करण्यात येईल. सदर खर्चासाठी प्रस्तावित केलेल्या प्रदूषण नियंत्रण कराच्या वसूल झालेल्या रकमेचा विनियोग करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

**सौरभ राव,**
आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,
पुणे विभाग, पुणे.

पुणे, २२ डिसेंबर २०२३.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.